सोमवार
**१९**
ऑक्टोबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २५३
पाने - ०४
किंमत - ४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28





# तरुणाईच्या विचारांतूनच घडेल सक्षम भारत

## सामाजिक बांधिलकीतून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्या – माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : पुणे येथील व्हीआयटीच्या सोशल वेल्फेअर अँड डेव्हलपमेंट कमिटीच्या वतीने आयोजित **'PRISM 2026'** या उपक्रमाला माजी मंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत जीवनप्रवास, ग्रामीण विकास, शिक्षण, युवा नेतृत्व, पर्यावरण, शाश्वत विकास आणि समाजपरिवर्तन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तरुणाई ही देशाची खरी ताकद असून, तरुणांच्या विचारांतून समाजाला नवी दिशा आणि त्यांच्या कृतीतून परिवर्तन घडते, असे प्रतिपादन त्यांनी केले.




आजच्या तरुणांनी समाजातील प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ बदलाची अपेक्षा न करता स्वतः बदलाचा भाग बनणे आणि स्वतःला शिस्त लावून तिचे पालन करणे, हीदेखील राष्ट्रसेवेची महत्त्वाची पायरी आहे. विद्यार्थिदशेत केवळ शिक्षण घेणे पुरेसे नसून, समाजातील घडामोडींचे भान ठेवणे आणि सामाजिक प्रश्नांप्रती आपली जबाबदारी ओळखणे तितकेच आवश्यक आहे. विद्यार्थी चळवळींमधून नेतृत्व घडते आणि समाजाप्रती जाणीव असलेली नवी पिढी तयार होते, असे थोरात यांनी सांगितले. ग्रामीण विकासाच्या संदर्भात बोलताना थोरात यांनी २००९ मध्ये राज्यात एक लाख शेततळी निर्माण करण्याचा घेतलेला निर्णय आणि आपल्या मंत्रीपदाच्या काळातील विविध महत्त्वपूर्ण निर्णयांचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडला. जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न सोडवण्याबरोबरच शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देता येते, यावर त्यांनी भर दिला. तसेच, वसंतदादा पाटील यांच्या काळात विनाअनुदानित महाविद्यालयांच्या माध्यमातून उच्च शिक्षणाच्या संधी वाढवण्याच्या प्रक्रियेला मिळालेली चालना आणि त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची खुली झालेली दारे, यांचाही त्यांनी उल्लेख केला.

देशाचे भविष्य घडवताना तरुणांनी स्वतःला एक महत्त्वाचा प्रश्न विचारला पाहिजे-आपल्याला देश कसा घडवायचा आहे? जाती-धर्माच्या भिंतींमध्ये अडकलेला देश की समता, बंधुता, विज्ञाननिष्ठ विचार आणि प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करणारा सक्षम भारत? आजच्या तरुणांच्या विचारांतून आणि कृतीतूनच या प्रश्नाचे उत्तर आकाराला येणार आहे. त्यामुळे तरुणांनी व्यापक दृष्टिकोन ठेवून शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड द्यावी आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन थोरात यांनी केले.

**'PRISM 2026'** सारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, नव्या विचारांना आणि सामाजिक जाणिवांना व्यासपीठ उपलब्ध करून देतात. विद्यार्थ्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास त्यांच्यातून समाजात मोठे परिवर्तन घडू शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## दुष्काळत पाच हजार फेकून मारता पण निवडणूकीत लाखोंची उधळपट्टी- खा. राऊत

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याच्या तिजोरीत पैसा नाही, मात्र जे राज्य चालवत आहेत, त्यांच्याकडे तिजोरीच्या लुटीतून आलेली प्रचंड संपत्ती आहे. सर्वात जास्त पैसा भाजप आणि शिंदे गटाकडे आहे. हा पैसा कुठून आणि कसा आला, याचा मुख्यमंत्र्यांनी खुलासा केल्यास राज्याचे कर्ज आपोआप कमी होईल. एवढेच नव्हे, तर कॅबिनेट बैठकीत मंत्र्यांचे खिसे झटकले तरी १ लाख कोटी रुपये जमा होऊ शकतात, असा घणाघाती आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे.



संजय राऊत म्हणाले की, राज्यात दुष्काळामुळे कोणी मरो किंवा जगलो, याशी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आणि मंत्र्यांना काहीही देणेघेणे राहिलेले नाही. मंत्री आणि मुख्यमंत्र्यांचा थाटमाट पाहिला, तर खरोखरच या राज्यावर ११ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे का, असा प्रश्न पडतो. केवळ गरिबांना रोजीरोटी मिळू द्यायची नाही, असे प्रकार सुरू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्र्यांच्या नावावर संस्था उभारायची असेल, तर महाराष्ट्र उभारणीसाठी ज्यांनी कष्ट घेतले, त्यांचे ते सगळे प्रयत्न वाया गेले आहेत.संजय राऊत म्हणाले की, सध्या राज्यात अत्यंत गंभीर परिस्थिती असून, आतापासूनच पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागासह पुणे आणि मुंबईत पुढील २ ते ४ महिन्यांत मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण होणार आहे. मुख्यमंत्री मोठमोठ्या घोषणा करून राज्य उत्तम चालल्याचा देखावा करत आहेत; परंतु त्यांना राज्यातील आर्थिक लूट अजूनही थांबवता आलेली नाही. विकास कामांच्या नावाखाली ठेकेदारांकडून कामे करून घेतली, मात्र सरकार त्यांना ९५ हजार कोटी रुपयांची थकबाकी देऊ शकले नाही, ज्यामुळे ठेकेदार आत्महत्या करत आहेत. राज्यावर ११ लाख कोटींचे कर्ज असताना या भीषण दुष्काळाचा सामना कसा करणार? असा सवाल त्यांनी केला.

संजय राऊत म्हणाले की, राज्यात पडलेल्या दुष्काळाशी सामना करण्यासाठी किमान ५० हजार कोटी रुपयांची गरज आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या तोंडावर सध्या मुख्यमंत्र्यांनी केवळ ५ हजार रुपयांची मदत फेकली आहे.

## लहान मुलांसाठीही 'इंटरनेट' हा मूलभूत हक्क - सुप्रिम कोर्ट

युवावार्ता (प्रतिनिधी)

लहान मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाने (सुप्रीम कोर्ट) एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय दिला आहे. घटनेच्या 'कलम २१' (जीवनाचा अधिकार) आणि 'कलम १९(१)(अ)' (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) अंतर्गत, इंटरनेट वापरण्याचा अधिकार हा लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाचा 'मूलभूत हक्क' असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मुलांची सुरक्षा आणि त्यांचे स्वातंत्र्य या दोन वेगवेगळ्या गोष्टी नसून त्या दोन्ही एकत्र जपणे गरजेचे आहे, असे परखड मत न्यायालयाने मांडले आहे.न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी केली.



इंटरनेट आणि सोशल मीडियावरून मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह मजकूर हटवण्यासाठी कडक यंत्रणा उभारण्याचे निर्देश देताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. मुलांना इंटरनेट वापरण्यापासून पूर्णपणे रोखणे चुकीचे असून, त्याऐवजी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'चाइल्ड मोड'सारखे सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देऊन त्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे, असे सूचक मत खंडपीठाने व्यक्त केले.

मुलांचे स्वातंत्र्य आणि सुरक्षा दोन्ही तितकेच महत्त्वाचेआपल्या आदेशात सुप्रीम कोर्टाने नमूद केले की, संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर फक्त मोठ्यांचाच हक्क नाही, तर कोणत्याही वयातील मुलांचाही त्यावर तितकाच अधिकार आहे. एखाद्या ठरावीक वयाखालील मुलांना समज नसते किंवा त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसते, असा विचार करून त्यांना या अधिकारांपासून पूर्णपणे दूर ठेवणे अयोग्य आहे. मुलांचे संरक्षण करणे जितके गरजेचे आहे, तितकेच त्यांचे स्वातंत्र्य जपणेही आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या विरोधात नसून, आपण मुलांना सुरक्षा आणि स्वातंत्र्य दोन्ही दिले पाहिजे.

## चनेगाव बंधाऱ्यावरून सतीश वाणी यांची उडी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील सतीश आप्पासाहेब वाणी (वय ३५) यांनी चनेगाव येथील वसंत बंधाऱ्यावरून उडी मारल्याची घटना शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेनंतर संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलीस प्रशासन, पाटबंधारे विभाग आणि रेस्क्यू टीमकडून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

### शोधमोहीम सुरू

मिळालेल्या माहितीनुसार, बंधाऱ्यावरून ये-जा करणाऱ्या काही ग्रामस्थांना एक व्यक्ती बंधाऱ्यावरून उडी मारताना दिसल्याचे सांगण्यात आले. घटनास्थळी कडेला दुचाकी उभी असल्याचे, तसेच जवळच मोबाईल फोन आढळल्याचे समोर आले. दुचाकी व मोबाईलच्या आधारे संबंधित व्यक्ती सतीश वाणी असल्याची ओळख पटल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी वाणी कुटुंबीयांना कळविले. त्यानंतर कुटुंबीयांनी आश्वी, राहुरी आणि लोणी पोलीस ठाण्यांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळाल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी रेस्क्यू टीम, पाटबंधारे विभाग आणि पोलीस प्रशासनाला तातडीने शोधमोहीम सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

शुक्रवारी रात्री आश्वी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांच्या सूचनेनुसार पोलीस कर्मचारी आहेर यांनी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मात्र, अंधारामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण झाले. शनिवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ, पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि राहता येथील रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली.

## सरपंच उज्वला देशमाने यांच्यावरील हल्ला म्हणजे गावातील महिलांवरील हल्ला, आरोपींना अटक करण्याची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: धांदरफळ बुद्रुक येथील प्रथम महिला सरपंच उज्वला नवनाथ देशमाने, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ देशमाने, नवनाथ नाईकवाडी आणि प्रशांत देशमाने यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ गावातील महिला मंडळे, बचत गट, नवरात्र उत्सव मंडळांचे प्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य आणि विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत काळ्या फिती बांधून तीव्र निषेध व्यक्त केला. यावेळी आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिला शक्तीचा जागर होत असतानाच सामाजिक कार्य करणाऱ्या महिला सरपंचांवर झालेल्या हल्ल्याने गावातील महिलांमध्ये संतापाची लाट उसळली. या घटनेचा निषेध करताना ग्रामपंचायत सदस्य तथा महिला बचत गट प्रमुख दिपाली वाकचौरे, स्वदेश महिला मंचच्या सारिका परदेशी, माजी उपसरपंच सोनाली शिंदे, सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या अध्यक्षा रूपाली म्हेत्रे, पंचशील मित्रपरिवारचे कैलास अडांगळे, मुस्लिम समाजाच्या वतीने डॉ. फिरोज तांबोळी, रामेश्वर देवस्थानचे विजय कोल्हे, समस्त ग्रामस्थांच्या वतीने बाळासाहेब देशमाने तसेच ग्रामपंचायतीचे आजी-माजी सदस्य मंडळाचे भानुदास शेटे उपस्थित होते.

दिपाली वाकचौरे आणि सारिका परदेशी यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देताना, धांदरफळ बुद्रुकमध्ये महिला सुरक्षित नसल्याची भावना निर्माण झाली आहे. महिलांसाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या प्रथम महिला सरपंचांवर झालेला हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नसून संपूर्ण गावाच्या इतिहासाला काळिमा फासणारी घटना आहे, असे सांगितले.

बाळासाहेब देशमाने यांनी, गेल्या दोन-अडीच वर्षांपासून काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमुळे गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सामाजिक काम करणाऱ्यांना वारंवार त्रास सहन करावा लागत आहे. सरपंचांवरील हा हल्ला म्हणजे गावातील प्रत्येक महिलेवरील हल्ला आहे, असे स्पष्ट केले.

दरम्यान, गावात पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, उपनिरीक्षक महेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळपासून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## शिक्षकांना प्रचारात उतरवणाऱ्या शिक्षण संस्थांवर कारवाईचा इशारा

मुंबई (वृत्तसंस्था)

शिक्षकांना निवडणूक प्रचारासाठी काम करण्यास भाग पाडणाऱ्या आणि उमेदवाराला मतदान न केल्यास नोकरीवरून काढण्याची धमकी देणाऱ्या शिक्षण संस्थाचालकांची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्यात येईल, असा इशारा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. अशा प्रकारे शिक्षकांवर दबाव आणणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्याचीही भूमिका त्यांनी मांडली. मुलांच्या शिक्षणाशी खेळ करून शिक्षकांना राजकीय प्रचारात उतरवणे सहन केले जाणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. बावनकुळे म्हणाले, राज्यात २८८ पैकी २३२ आमदार महायुतीचे असल्याने सरकार भक्कम आहे. निवडणुकीच्या काळात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. विदर्भात महायुतीची स्थिती मजबूत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महायुतीच्या विरोधात कोणी काम करू नये, अशा सूचना दिल्या आहेत. अमरावती शिक्षक मतदारसंघातून महायुतीने शिवसेनेच्या किरण सरनाईक यांना उमेदवारी दिली आहे. सरनाईक निवडून आल्यास शिक्षकांचे मूळ प्रश्न सोडवण्यासाठी ते महायुतीच्या नेत्यांकडे पाठपुरावा करतील. शिक्षकांच्या प्रश्नांवर काम करणारा नेता म्हणून ते परिचित आहेत. त्यासोबतच राज्यातील पाचही जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.निवडणुकीच्या राजकारणासाठी काही शिक्षण संस्थांचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी कानावर आल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, मतदान करणे हा प्रत्येकाचा अधिकार आणि जबाबदारी आहे. मात्र, एखाद्या उमेदवाराला मतदान करण्यासाठी शिक्षकांवर दबाव आणणे किंवा मतदान न केल्यास नोकरीवरून काढण्याची धमकी देणे गंभीर बाब आहे. अशा तक्रारी आल्यास संबंधित संस्थेची एसआयटीमार्फत चौकशी केली जाईल आणि गरज पडल्यास मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

## भुसार माल बाजार आवारात विक्रीस आणण्याचे आवाहन- सभापती तिकांडे

युवावार्ता (प्रतिनिधी)

समशेरपूर - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अकोले, कोतुळ, समशेरपूर येथील यशस्वी झालेला भाजीपाला लिलावा द्वारे विक्री आणि त्यासाठी अकोले तालुक्यातील शेतकऱ्यां बरोबर संगमनेर, सिन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिलेला प्रतिसाद. या तिन्ही बाजार आवारात शेतकरी व्यापारी वर्गाने व्यक्त केलेले समाधान व्यक्त करीत आहेत.



शेतकरी वर्गाकडून ज्या पद्धतीने भाजीपाला लिलाव सुरू त्याच पद्धतीने भुसार (सोयाबीन मका भात बाजरी गहू हरभरा इ.) शेतमालाचे लिलाव सुरू करावे अशी मागणी करत होते. काही परवाना नसलेले व्यापारी वर्गाकडून जागेवर जाऊन खरेदी करतात त्यासाठी अनधिकृत वजन काट्याचा वापर केला जातो तसेच काही लोकांचा विश्वास संपादन करून मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते पुढे पुढे रक्कम थकवली जाते अशा अनेक तक्रारी बाजार समिती कडे येत असतात अशा पद्धतीने होणारी फसवणूक टाळण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत ज्या पद्धतीने भाजीपाला लिलाव सुरू केला आहे त्याच पद्धतीने भुसार शेतमालाचे लिलाव सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे . त्यासाठी तालुक्यातील सर्व अधिकृत व्यापारी वर्गाने बाजार आवारात खरेदी सुरू करण्याचा निर्णयाला प्रतिसाद देतील अशी अपेक्षा आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी आपला भुसार शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समिती अकोले आवारात विक्री करण्यासाठी आणावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती श्री भानुदास पाटील तिकांडे उपसभापती रोहिदास पाटील भोर सचिव राजेंद्र जगताप आणि सर्व संचालक मंडळाने केले आहे.

## संदीप आखाडे यांचा राज्य शासनाकडून गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सामाजिक बांधिलकी जपत समाजातील वंचित, उपेक्षित आणि भटके-विमुक्त घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे सामाजिक कार्यकर्ते संदीप भाऊ आखाडे यांच्या उल्लेखनीय कार्याची महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने दखल घेतली आहे. विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज यांनी पत्राद्वारे त्यांच्या कार्याचे कौतुक व अभिनंदन केले.



समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देणे, त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, हे सामाजिक कार्याचे महत्त्वाचे अंग आहे. याच भावनेतून संदीप आखाडे यांनी भटके-विमुक्त समाजाच्या हक्कांसाठी राबविण्यात आलेल्या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवत मोलाचे योगदान दिले. समाजातील नागरिकांना आवश्यक शासकीय दाखले व प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी तसेच प्रशासकीय यंत्रणेशी समन्वय साधून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले आहेत.

भटके-विमुक्त समाजातील अनेक नागरिकांना आजही विविध सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागते. आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे अनेकदा पात्र नागरिक शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. अशा नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, शासकीय योजनांची माहिती

### भटके विमुक्तांसाठी समर्पित काम

देणे आणि आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी मदत करणे, या कामाला मोठे सामाजिक महत्त्व आहे. संदीप आखाडे यांनी सामाजिक संवेदनशीलता आणि सेवाभाव जपत या अभियानात सहभाग घेतल्याने त्यांच्या कार्याची शासनस्तरावर दखल घेण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, टाटा सामाजिक विज्ञान संस्थेसारख्या नामांकित शैक्षणिक संस्थेतील संशोधनकार्याची सांगड प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाशी घालत वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या हक्कांसाठी योगदान देण्याच्या कार्याचेही संबंधित पत्रात कौतुक करण्यात आले आहे. संशोधन, सामाजिक जाणीव आणि प्रत्यक्ष कृती यांचा समन्वय साधून समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केले जाणारे प्रयत्न समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. सामाजिक कार्यकर्ते संदीप आखाडे यांच्या कार्याची राज्य शासनाच्या विभागाकडून दखल घेतली गेल्याने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, अशी भावना व्यक्त होत आहे. सामाजिक कार्य करताना प्रसिद्धीपेक्षा समाजातील गरजू घटकांच्या समस्या समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देणे महत्त्वाचे असते. वंचित समाजाच्या हक्कांसाठी काम करताना सामाजिक बांधिलकी जपण्याची भूमिका संदीप आखाडे यांच्या कार्यातून अधोरेखित होत आहे. समाजातील वंचित घटकांसाठी त्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद असून, त्यांच्या सामाजिक कार्याचा गावाला अभिमान वाटतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यापुढील काळातही संदीप आखाडे यांनी सामाजिक बांधिलकी जपत समाजहिताचे कार्य सुरू ठेवावे, अशा शुभेच्छाही त्यांना देण्यात आल्या.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# राज्यातील धरणांमध्ये ७१.४८ टक्के पाणीसाठा; गतवर्षीच्या तुलनेत २७९ टीएमसीने घट

युवावार्ता (प्रतिनिधी) : राज्यातील प्रमुख मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये १५ ऑक्टोबर २०२६ अखेर ७१.४८ टक्के म्हणजेच १,०३०.५९ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी याच दिवशी हा साठा ९०.८४ टक्के म्हणजेच १,३०९.७२ टीएमसी होता. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत तब्बल २७९.१३ टीएमसी पाणीसाठा कमी असून, राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिण्याचे पाणी आणि शेतीच्या सिंचनाचे नियोजन हे मोठे आव्हान ठरणार आहे. आगामी रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सिंचन कार्यक्रम निश्चित करताना पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार असल्याचे मत जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त अभियंता तथा जलसंपत्ती अभ्यासक इंजि. हरिश्चंद्र र. चकोर यांनी व्यक्त केले.

राज्यातील सुमारे ३,०३३ प्रमुख जलप्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेताना चकोर यांनी ही माहिती दिली. दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी धरणांमधील उपयुक्त पाणीसाठ्याच्या आधारे रब्बी हंगाम आणि उन्हाळी हंगामाचा प्राथमिक सिंचन कार्यक्रम (झ.ख.झ.) निश्चित केला जातो. मात्र, यंदा अनेक भागांत पावसाचे प्रमाण असमाधानकारक राहिल्याने आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने या कार्यक्रमावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## पाणी जपून वापरण्याचे आवाहन



– इंजि. हरिश्चंद्र र. चकोर
संगमनेर (अहिल्यानगर)

यंदाच्या पाणीस्थितीचा विचार करता पुढील ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कायम ठेवणे हे जलसंपदा विभागापुढील महत्त्वाचे आव्हान असेल. शेतीसाठी पाणी वापरताना ठिबक व तुषार सिंचनासारख्या पाणी बचतीच्या उपायांना प्राधान्य देणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध साठ्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. नागरिकांनीही पाणी वापराबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन इंजि. हरिश्चंद्र र. चकोर यांनी केले. राज्य शासन, जलसंपदा विभाग आणि संबंधित प्रशासनाने उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन पिण्याचे पाणी, शेती सिंचन आणि औद्योगिक वापर यांचा समतोल राखणारे नियोजन करणे आवश्यक आहे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन आणि काटकसरीचा वापर हाच आगामी काळातील पाणीटंचाईचा सामना करण्याचा महत्त्वाचा मार्ग ठरणार आहे.

**मराठवाड्याची स्थिती चिंताजनक**

राज्यातील सहा महसुली विभागांपैकी कोकण विभागात सर्वाधिक ८८.४७ टक्के, तर पुणे विभागात ८२.४१ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. नाशिक विभागात ७९.६४ टक्के, नागपूर विभागात ६७.१६ टक्के आणि अमरावती विभागात ६०.३४ टक्के पाणीसाठा आहे. छत्रपती संभाजीनगर अर्थात मराठवाडा विभागात मात्र केवळ ४२.३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याने या भागातील पाणीटंचाईची चिंता कायम आहे. विदर्भ, अमरावती आणि मराठवाड्यातील अनेक भागांत परतीच्या पावसाची आवश्यकता असल्याचे चकोर यांनी सांगितले.

**अहिल्यानगर जिल्ह्यात ७४.१५ टक्के पाणीसाठा**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाच्या १३ प्रमुख प्रकल्पांमध्ये एकूण ३८.६३० टीएमसी म्हणजेच ७४.१५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती चकोर यांनी दिली. गतवर्षीच्या तुलनेत हा साठा सुमारे १३.४५ टीएमसीने कमी आहे. जिल्ह्याच्या उत्तर भागातील भंडारदरा, निळवंडे, मुळा आणि आढळा या प्रकल्पांमध्ये समाधानकारक पाणीसाठा आहे. भंडारदरा आणि आढळा हे प्रकल्प जवळपास पूर्ण क्षमतेने भरले आहेत. दुसरीकडे, दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्यातील सीना, खैरी, मांडोहोळ आणि घाटशीळ-पारगाव या प्रकल्पांमध्ये पाणीसाठा अत्यल्प आहे. या प्रकल्पांतील सरासरी पाणीसाठा सुमारे २६.५१ टक्के असल्याने दक्षिण भागातील शेतकऱ्यांसमोर सिंचनाचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे.

**प्रमुख धरणांतील पाणीसाठा**

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

भंडारदरा : ११.०३९ टीएमसी (१०० टक्के), निळवंडे : ५.९३९ टीएमसी (७१.२६ टक्के), मुळा : १८.१३९ टीएमसी (६९.७७ टक्के), आढळा : १.०५७ टीएमसी (९९.७२ टक्के), सीना : ०.७४९ टीएमसी (३१.२१ टक्के), खैरी : ०.०७७ टीएमसी (१४.३८ टक्के), मांडोहोळ : ०.०६७ टीएमसी (१६.९५ टक्के), घाटशीळ-पारगाव : पाणीसाठा शून्य, विसापूर : ०.६३३ टीएमसी (७०.०२ टक्के), पिंपळगाव खांड : ०.६०० टीएमसी (१०० टक्के).

दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्याला सिंचनाचा लाभ मिळवून देणाऱ्या पुणे जिल्ह्यातील घोड धरणासह कुकडी प्रकल्प समूहातही चांगला पाणीसाठा असल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, आगामी काळात पाण्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे.

**जायकवाडीतील पाणीसाठ्यामुळे दिलासा**

मराठवाडा आणि अहिल्यानगर जिल्ह्यासाठी महत्त्वाच्या जायकवाडी धरणात सध्या ८४.७५ टीएमसी एकूण पाणीसाठा असल्याचे चकोर यांनी नमूद केले. धरणात नव्याने सुमारे ६६.६३३ टीएमसी पाण्याची आवक झाली असून, गोदावरी नदीपात्रात सुमारे ५.७९० टीएमसी पाणी सोडण्यात आले आहे. खरीप हंगामातील सिंचन, औद्योगिक व बिगर सिंचन वापर तसेच बाष्पीभवनामुळेही पाण्याचा वापर झाला आहे. उपलब्ध पाणीसाठा आणि पाण्याची सद्यस्थिती लक्षात घेता, समन्यायी पाणीवाटप कायदा २००५ मधील तरतुदींच्या अधीन राहूनही सध्याच्या घडीला नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांतील धरण समूहांतून जायकवाडीसाठी अतिरिक्त पाणी सोडण्याची आवश्यकता दिसत नसल्याचे मत चकोर यांनी व्यक्त केले.

**भोजापूर धरणाच्या पाण्याचा दुष्काळी भागाला आधार**

संगमनेर तालुक्यातील निमोण-तळेगाव परिसरातील दुष्काळी भागासाठी महत्त्वाच्या भोजापूर धरणात सुमारे ९४ टक्के पाणीसाठा झाला आहे. धरणातून तीन वेळा अतिरिक्त पाणी वाहून गेले असून, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आदेशाने आणि संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांच्या प्रयत्नांतून सुमारे ७८३ दशलक्ष घनफूट पाणी कालव्याद्वारे सोडण्यात आले आहे. या पाण्यामुळे लघुपाटबंधारे तलाव, पाझर तलाव, गाव तलाव तसेच दगडी व कॉंक्रीट बंधारे भरण्यास मदत झाली असून, परिसरातील पिण्याच्या पाण्यासह सिंचनासाठी काहीसा दिलासा मिळाला आहे.

**नाशिकमधील धरणांमध्ये समाधानकारक साठा**

नाशिक जिल्ह्यातील धरणांमध्ये सुमारे ९४.६२ टक्के म्हणजेच ४७.७६ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षीच्या तुलनेत हा साठा सुमारे २.४८ टीएमसीने कमी आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत झालेल्या चांगल्या पावसामुळे नाशिक जिल्ह्यातील धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात आले. नांदूर-मधमेश्वर बंधाऱ्यातून जायकवाडीकडे सुमारे ५८.१०८ टीएमसी पाणी सोडण्यात आल्याची माहितीही चकोर यांनी दिली.

गंगापूर धरणात ९५.६७ टक्के, दारणा धरणात ९८.१४ टक्के, कडवा धरणात (पान ७ वर)

# जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत अमृतवाहिनी मॉडेल स्कूलची दमदार कामगिरी

## मुलींचा संघ द्वितीय, तर मुलांचा संघ तृतीय



संगमनेर (प्रतिनिधी) : जिल्हास्तरीय
युवावार्ता (प्रतिनिधी)

हॉकी स्पर्धेत अमृतवाहिनी मॉडेल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, अमृतनगर, संगमनेर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. स्पर्धेत शाळेच्या १७ वर्षांखालील (ण-१७) मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक, तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज दिली. खेळाडूंची मेहनत, शिस्त, सांघिक भावना आणि जिंकण्याची जिद्द या यशातून अधोरेखित झाली. विद्यार्थ्यांनी मैदानावर दाखवलेली जिद्द आणि खेळातील कौशल्य यामुळे अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या क्रीडा गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली.

मुलींच्या संघाचे नेतृत्व कर्णधार कु. जोशना भोये हिने, तर मुलांच्या संघाचे नेतृत्व कर्णधार साई बोडके याने केले. दोन्ही संघांना शाळेचे क्रीडा शिक्षक व मार्गदर्शक रविंद्र कदम, जयराज दुशिंग, रोहित गाडे आणि वृशाली भागवत यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि सांघिक समन्वयाच्या बळावर हे यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षकवृंद आणि क्रीडाप्रेमींनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे आणि संगमनेरचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात, संस्थेचे विश्वस्त व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्त शरयू देशमुख, विश्वस्त अनिल शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. बी. धुमाळ, शाळेचे प्राचार्य आशिष कुमार यांच्यासह सर्व विभागप्रमुख व शिक्षकांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अभाविपतर्फे 'मणिकर्णिका युवती संमेलन' ७०० विद्यार्थिनींच्या उपस्थितीत उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

अंभोरे- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने 'माणिकर्णिका युवती संमेलन' कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे करण्यात आले. या संमेलनास तालुक्यातील विविध महाविद्यालयांतील सुमारे ७०० विद्यार्थिनींची उत्स्फूर्त उपस्थिती राहिली व संमेलन उत्साहात पार पडले.

या संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी सांस्कृतिक प्रचारक कु. मीनाक्षी सहरावत यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मालपाणी फार्मच्या संचालिका व संगमनेर नगरपालिकेच्या नगरसेविका सौ. रचनाताई मालपाणी, अभाविप पश्चिम महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री कु.श्रावणी बाचल आणि संमेलन प्रमुख कु.वैष्णवी शिंदे, जिल्हा संयोजक हर्ष खोल्लम उपस्थित होते.

यामध्ये अभाविपच्या प्रदेश सहमंत्री कु.श्रावणी बाचल यांनी विद्यार्थिनींना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा ७८ वर्षांचा प्रवास आणि युवतींच्या सामाजिक सहभागाविषयी मार्गदर्शन केले. तसेच समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेल्या परिवर्तनाच्या पाच महत्त्वपूर्ण मुद्द्यांची मांडणी त्यांनी केली. युवतींनी केवळ शिक्षण आणि करिअरपुरते मर्यादित न राहता सामाजिक प्रश्नांमध्येही सक्रिय सहभाग घेऊन नेतृत्वाची भूमिका बजावावी असे आवाहन मालपाणी फार्मच्या संचालिका सौ. रचनाताई मालपाणी यांनी केले.

या संमेलनामध्ये भारतीय संस्कृती व आजची विद्यार्थिनी या विषयावर भाषण झाले. यावेळी प्रमुख वक्त्या कु. मीनाक्षी सहरावत यांनी विषयाची मांडणी केली. आजच्या त्रक्षाप न विद्यार्थिनींनी भारतीय परंपरा आणि संस्कृतीचे दैनंदिन जीवनात पालन करून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूटमध्ये वाचन प्रेरणा दिन



युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी - श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट, माळवाडी (बोटा) येथील फार्मसी महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि युवा पिढीचे प्रेरणास्थान भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्षातील विद्यार्थिनी गायत्री शिंगोटे व अपूर्वा मोरे यांनी प्रभावीपणे केले. विद्यार्थी ओम गुंजाळ आणि तनुजा धुमाळ यांनी आपल्या भाषणांतून विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाची, वैज्ञानिक दृष्टिकोनाची आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाची ओळख करून दिली.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल शंकर राशिनकर यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विशद करताना डॉ. कलाम यांना अभिवादन करण्यासाठी 'एक वाढदिवस, एक पुस्तक दान' ही अभिनव संकल्पना मांडली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याबरोबरच विद्यार्थी विचार समृद्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव आरोटे यांनी आपल्या मनोगतात वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, सातत्य आणि वाचनाच्या माध्यमातून आपले ध्येय साध्य करण्याचा संदेश दिला. तसेच सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीचा संदर्भ देत पाण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान असून पाण्याची बचत, योग्य वापर आणि जलसंवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी 'एक वाढदिवस, एक पुस्तक दान' या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच त्यांनी स्वतः एक पुस्तक दान करून या संकल्पनेचा प्रत्यक्ष शुभारंभ केला. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. निशा वरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम, द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी केले. डॉ. केशव आरोटे यांनी आभार प्रदर्शन केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सागर सांगळे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव आरोटे, प्रा. सचिन वाकचौरे, प्रा. स्वप्निल वरे, ग्रंथपाल शंकर राशिनकर, प्रा. स्नेहा फंड, प्रा. समीक्षा बिबवे, प्रा. मयुरी डुंबरे, प्रा राधिका जाधव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# संगमनेरात 'खेळ पैठणीचा' 'सन्मान स्त्री शक्तीचा' कार्यक्रम साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर येथे नवरात्रोत्सवानिमित्त नाईट क्रिकेट क्लबच्या वतीने 'खेळ पैठणीचा - सन्मान स्त्री शक्तीचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) करण्यात आले. या कार्यक्रमाला महिला भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना आनंदाचे व सन्मानाचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने विविध मनोरंजनात्मक खेळ व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी मोठ्या उत्साहाने या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. स्पर्धेत प्रथम क्रमांकाची मानाची पैठणी कार्तिकी सुरेंद्र गवंडी यांनी पटकावली, तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक चारुशीला नितीन काळे यांनी मिळवले. विजेत्यांना मानाची पैठणी व आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नाईट क्रिकेट क्लबच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रायोजक, देणगीदार तसेच सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाला उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद देणाऱ्या सर्व महिला भगिनींचे क्लबच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन नाईट क्रिकेट क्लबच्या वतीने करण्यात आले होते. क्लबचे सदस्य ओम परदेशी, साई परदेशी, संकेत डोंगरे, ओम डोंगरे, यश कोळपकर, नचिकेत खोले, प्रथम वाघमारे, वैभव आमले, सार्थक खरे, कृष्णा डंबिर, दीपाराज पाटणकर, तेजस ओहोळ, श्रीराज गोंगे, शंतनू व्हावले, साईराज शेरे, गणेश काळे, ओम भडांगे, शुभम भिंगारे, प्रसाद आमले, अमित पवार, ओंकार काळे, श्रेयस मुळे, श्लोक मुळे, ऋषिकेश खडांगळे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगदान दिले.

**पाईल्सचा कायमचा उपाय !**
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध

**ताम्हाणे हॉस्पिटल**

| पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA) |
|---|---|---|

**आधुनिक उपचार पद्धती**
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी

फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100

सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28









# तळेगाव दिघेत बंद घरात चोरी

## सोन्याचे दागिने, चांदीचे जोडवे व कागदपत्रे गायब



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथे घराच्या मुख्य दरवाजाची कडी उचकटून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील कपाटाचे लॉकर फोडून सोन्याचे दागिने, चांदीचे जोडवे आणि महत्त्वाची कागदपत्रे असा एकूण ६१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना १५ ऑक्टोबरच्या मध्यरात्री घडली. या प्रकरणी रोहिणी संजय दिघे यांनी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रोहिणी दिघे या पती संजय दिघे आणि कुटुंबीयांसह तळेगाव दिघे येथे राहतात. त्यांचे पती शिक्षक असून, कुटुंब शेती व्यवसायही करते. १५ ऑक्टोबर रोजी रात्री अकराच्या सुमारास जेवण झाल्यानंतर कुटुंबातील सर्वजण घरात झोपले होते. घराच्या मुख्य दरवाजाला आतून कडी लावलेली होती. रोहिणी दिघे व त्यांचे पती कपाट असलेल्या खोलीत, तर मुलगी व सासू हॉलमध्ये आणि मुलगा दुसऱ्या बेडरूममध्ये झोपले होते.

१६ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास संजय दिघे नेहमीप्रमाणे उठले असता त्यांना कपाटाचा दरवाजा उघडा आणि बेडरूमचा दरवाजा अर्धवट बंद असल्याचे दिसले. त्यानंतर त्यांनी पत्नीसमवेत घरातील इतर सदस्यांची पाहणी केली. सर्वजण झोपलेले असल्याचे लक्षात आल्यानंतर स्वयंपाकघरात सोन्याचे दागिने ठेवलेली रिकामी पाकिटे अस्ताव्यस्त पडलेली आढळली.

संशय आल्याने त्यांनी बेडरूममधील कपाट तपासले असता लॉकरचा दरवाजा गायब असल्याचे दिसून आले. घराच्या मुख्य दरवाजाला आतून लावलेली कडी आणि तिचा कोंडा कोणीतरी उचकटल्याचेही त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरट्याने दरवाजाची कडी उचकटून घरात प्रवेश केला आणि कपाटाचे लॉकर फोडून दागिने व कागदपत्रे चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. चोरीस गेलेल्या ऐवजात २० हजार रुपये किमतीची १४ ग्रॅम वजनाची सोन्याची मोहनमाळ, ३० हजार रुपये किमतीचे ३६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मोठे गठण, आठ हजार रुपये किमतीची आठ ग्रॅम वजनाची काळ्या मण्यांत ओवलेली सोन्याची पोत आणि तीन हजार रुपये किमतीचे दहा ग्रॅम वजनाचे चांदीचे जोडवे यांचा समावेश आहे. याशिवाय पतीचे ड्रायव्हिंग लायसन्स, एटीएम कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि शाळेशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रेही चोरीला गेली आहेत. घरातील सामान अस्ताव्यस्त करून सर्वत्र शोध घेतल्यानंतरही दागिने व कागदपत्रे मिळून आली नाहीत. त्यामुळे घरात चोरी झाल्याची खात्री पटल्यानंतर रोहिणी दिघे यांनी पोलिसांत धाव घेत अज्ञात चोरट्याविरुद्ध फिर्याद दाखल केली. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# एफडीएतील अनियमिततांचा पर्दाफाश

## पाच वरिष्ठ अधिकारी निलंबित; आणखी २० अधिकारी रडारवर

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक -: अन्न व औषध प्रशासनातील (एफडीए) कथित अनियमिततांचे प्रकरण आता चांगलेच तापले असून, विभागातील कारवाईचा फास आणखी आवळण्याची शक्यता आहे. मालेगावातील सुपारी प्रकरणात पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्यानंतर आता याच विभागातील आणखी २० हून अधिक अधिकारी चौकशीच्या रडारवर असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एफडीएच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.




मालेगाव येथे जप्त करण्यात आलेली २५२.३८ मेट्रिक टन सुपारी नष्ट केल्याचे दाखवून प्रत्यक्षात तिची विल्हेवाट लावण्यात आली नसल्याचा आरोप या प्रकरणाच्या केंद्रस्थानी आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. नाशिक येथील सहआयुक्त अविनाश दाभाडे, अमित्र रासकर आणि गोपाळ कासार, मुंबईचे सहआयुक्त योगेश देशमुख तसेच धुळे येथील सहायक आयुक्त सुवर्णा महाजन यांचा निलंबित अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे. अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवळ यांनी निलंबनाच्या आदेशांची माहिती दिली.

एफडीएच्या गुप्तवार्ता विभागाने मालेगाव येथे कारवाई करत सुपारीने भरलेले ११ ट्रक जप्त केले होते. तब्बल ३ हजार ६०५ पोत्यांमध्ये असलेल्या या साठ्याचे बाजारमूल्य सुमारे १० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात आले. अन्न विश्लेषकांच्या अहवालात ही सुपारी खाण्यास अयोग्य असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर न्यायालयाने ४ मार्च २०२५ रोजी ती नष्ट करण्याचे आदेश दिले होते. मात्र, सुपारी जाळून नष्ट केल्याचे दाखविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात तिची विल्हेवाट लावण्यात आली नसल्याचा आरोप पुढे आला. याशिवाय, या प्रकरणाशी संबंधित चौकशीची फाईल दडपून ठेवल्याचाही आरोप आहे. त्यामुळे संबंधित नोंदी, कागदपत्रे आणि प्रत्यक्ष कार्यवाही यांची पडताळणी महत्त्वाची ठरत आहे.

मालेगावातील प्रकरणानंतर आता एफडीएतील इतर अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीचीही तपासणी होण्याची शक्यता आहे. कार्यक्षेत्राच्या मर्यादा ओलांडून छापे टाकणे, तसेच वैयक्तिक हितसंबंधांतून कारवाई केल्याचे आरोप काही अधिकाऱ्यांवर करण्यात आले आहेत. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर आणखी २० हून अधिक अधिकाऱ्यांची चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संभाव्य कारवाईत नाशिक, पुणे आणि भिवंडी येथील अधिकाऱ्यांची संख्या अधिक असल्याची माहिती समोर येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची पडताळणी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाण्याची शक्यता आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली विभागातील कारभाराची तपासणी आणि नियमांची कठोर अंमलबजावणी यावर लक्ष केंद्रित झाले आहे. मालेगावातील सुपारी प्रकरणामुळे विभागातील नियंत्रण व्यवस्था, कारवाईची पारदर्शकता आणि अधिकाऱ्यांच्या जबाबदारीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निलंबनानंतर आता आणखी किती जणांवर कारवाई होणार, चौकशीतून कोणती नवी माहिती समोर येणार आहे.

## ट्रकच्या धडकेत १५ भाविकांचा मृत्यू

मध्य प्रदेशाच्या ग्वाल्हेरमध्ये शनिवारी मध्यरात्री एका भरधाव ट्रकने ४१ भाविकांना चिरडले. त्यात १५ जणांचा मृत्यू झाला. तसेच दोन पोलीस कर्मचाऱ्यांसह इतर २६ जण जखमी झाले आहेत. ही घटना पहाटे दीडच्या सुमारास चिनोर रोडवरील एका उताराजवळ घडली. भाविक शितला माता मंदिरात जाण्यासाठी रस्त्याच्या कडेला रांगेत उभे होते. त्याच वेळी, चिनोरच्या दिशेने येणारा आणि भाताने भरलेला एक ट्रक उतारावर अनियंत्रित झाला. ट्रकचालक गुगल मॅप्सच्या मदतीने मार्ग शोधत होता. उतारावरून खाली येत असताना ट्रकचे ब्रेक निकामी झाले. ट्रकने पोलीस चेकपोस्ट तोडले, भाविकांना धडक दिली आणि शेवटी मंदिराच्या बाहेरील भिंतीवर व प्रवेशद्वारावर जाऊन आदळला. या धडकेमुळे मंदिराची भिंत कोसळली आणि अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकले. जखमींना जयारोग्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर, पीडितांच्या नातेवाईकांनी पोलिसांवर निष्काळजीपणाचा आरोप करत गोंधळ घातला.


**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी**

आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# कोलकाता चेंगराचेंगरीत १९ ठार

कोलकत्ता (वृत्तसंस्था)

कोलकात्याच्या चोरबागन भागात शनिवारी रात्री दुर्गा पूजेच्या मंडपात झालेल्या चेंगराचेंगरीत १९ जणांचा मृत्यू झाला, तर २५ जण जखमी झाले. पोलिसांनी पूजेच्या आयोजकांसह सात जणांना अटक केली आहे.

गिरीश पार्क पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमींवर कोलकात्यातील तीन वेगवेगळ्या रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. अपोलो रुग्णालयात १४ जणांना दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी पाच जण अतिदक्षता विभागात आहेत; त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक आहे. रविवारी सकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. ते दोन दिवसांच्या दौऱ्यावर शनिवारी कोलकात्यात आले होते, मात्र या घटनेनंतर त्यांनी आपले सर्व नियोजित कार्यक्रम रद्द केले.असे वृत्त आहे की, चेंगराचेंगरी होण्यापूर्वी मंडप रिकामा करण्याच्या घोषणा केल्या जात होत्या. मंडपाच्या आत, एका मायक्रोफोनमधून घोषणा करण्यात आली, मंडपाची अवस्था खूपच वाईट आहे. तो कोसळू शकतो. कृपया बाहेर पडा. त्याच क्षणी, ३६०-डिग्री मंडपाला वेढलेल्या अरुंद गल्लीतून बाहेर पडण्यासाठी लोकांमध्ये धक्काबुक्की सुरू होती. पावसामुळे रस्ता निसरडाही झाला होता. कोलकाता येथील चोरबागान दुर्गा पूजा मंडपात झालेल्या चेंगराचेंगरीपूर्वी गर्दीचे व्यवस्थापन अपुरे होते. घटनेपूर्वी घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका स्थानिक पत्रकाराच्या म्हणण्यानुसार, मंडपाकडे जाणारा मार्ग अरुंद होता आणि सुमारे ३०० मीटर लांब रांगेतील गर्दी व्यवस्थापित करण्यासाठी केवळ दोन सुरक्षा रक्षक तैनात होते.







**चैतन्य हॉस्पिटल**

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 - 224761, मोबा. 7038170382



**नोकरीची सुवर्णसंधी**

**'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'**
**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165








स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
**कुटे हॉस्पिटल** अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

सर्जरी विभाग | डायलिसीस विभाग | हृदयरोग विभाग | जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25